# नियमीत दिवाणी दावा नं.२१४/२०२२ मधील नि.२५ खालील आदेश

**CNR : MHSN06001428-2022**

**(दिपक दत्तात्रय कोरे वि. रियाज गुलाब सय्यद आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापनासाठी तसेच निरंतर ताकिदी करिता दाखल केलेला आहे. सदर दावेकामी प्रतिवादी क्र.०७ रमेश चंद्राप्पा जरळी हे दि.२१/१२/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांची पत्नी यापूर्वीच मयत झाल्या आहेत.

**मयत प्रतिवादी क्र.०७ यांचे कायदेशीर सरळ वारसांची माहिती खालील प्रमाणेः–**

| अ.नं. | वारसांची नावे | मयताशी नाते |
|---|---|---|
| ७अ) | **उमा कलगोंडा पाटील**<br>वय वर्षे-४५, धंदा - घरकाम<br>रा. नरवाड, ता. मिरज, जि. सांगली. | मुलगी |
| ७ब) | **विजय रमेश जरळी**<br>वय वर्षे-४२, धंदा - व्यापार<br>रा. बसवान गल्ली, संकेश्वर, ता. हुक्केरी, जि. बेळगाव. | मुलगा |
| ७क) | **अजय रमेश जरळी**<br>वय वर्षे-४०, धंदा - शेती<br>रा. बसवान गल्ली, संकेश्वर, ता. हुक्केरी, जि. बेळगाव. | मुलगा |

मयत प्रतिवादी क्र.०७ यांना सदरचे वारसां व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत.वर नमूद वारसांची नांवे मयत वारस या नात्याने अभिलेखावर घेणेकरिता तसेच सदर दावे कामी तशी नि.क्र.०१ कडे दुरुस्ती करण्या विषयी परवानगी मिळावी अशी

विनंती करतात.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी अर्जावरच म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, प्रतिवादी क्र. ०७ हे दि.२१/१२/२०२२ रोजी मयत झालेले आहेत. त्यामुळे वादीचा सदरचा अर्ज मुदतीत नाही. सबब वादीचा अर्ज नामंजूर करणेत यावा. विकल्पेकरुन अर्ज मंजूर करणेचा झालेस सदरचा अर्ज हा खर्चासह मंजूर करणेत यावा अशी विनंती करतात.

**०३.** सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापनासाठी तसेच निरंतर ताकिदी करिता दाखल केलेला आहे. सदर दावेकामी प्रतिवादी क्र.०७ रमेश चंद्राप्पा जरळी हे दि.२१/१२/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यांची पत्नी यापूर्वीच मयत झाल्याचे दिसून येत आहे. मयत प्रतिवादी क्र.०७ यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कायदेशीर वारसांची नांवे अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता, सदरचे वारस अभिलेखावर घेणे न्यायोचीत वाटते. म्हणून सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१.** वादींचा नि. क्र. २५ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.०७ यांच्या वारसांना सदर कामी अभिलेखावर आणावे. त्या अनुषंगाने आज पासून १४ दिवसाच्या आत नि.क्र.०१ वर दुरुस्ती करुन पुढील कायदेशीर पूर्तता करावी.

MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVARAJ MANAGULI
Date: 2023.07.06 16:26:03 +0530

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.०६/०७/२०२३ तिसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | 3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 06/07/2023 |
| Order signed by the Presiding Officer on | : | 06/07/2023 |
| **Order uploaded on** | **:** | **06/07/2023** |